Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

५१ /२०२३

**विषय - वेबसाईटवर प्रसिध्द केलेली व इमारतीमधील फलकांव्दारे प्रसिध्द केलेली माहिती तपासणे व अद्यावत करणेबाबत...**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या वेबसाईटवर विविध प्रकारची माहिती प्रसिध्द करणेत येते. विद्यार्थ्यांसाठी व अभ्यागतांसाठी विद्यापीठाच्या वेबसाईटवर अद्यावत माहिती प्रसिध्द करुन वेबसाईट अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. याअनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली माहिती सर्व अधिविभाग व प्रशासकीय विभागांनी तपासून जूनी किंवा कालमर्यादा संपलेली माहिती आवश्यकता नसलेस विभागामार्फत मान्यता घेवून काढणेत यावी किंवा सदरची माहिती ठेवणे आवश्यक असलेस त्याठिकाणी दिनांक, कालावधी नमूद करावा तसेच, प्रसिध्द केलेल्या माहितीमध्ये कार्यकाळ किंवा कालावधी संपलेला असेल तर, त्या व्यक्तीच्या नावासमोर माजी किंवा तत्कालीन असे शब्द प्रयोग करणेत यावेत. तसेच, अधिविभाग व प्रशासकीय विभागांनी आपल्या विभागांशी संबधित असलेली सर्व माहिती (उदा. परिपत्रक, नियमावली, माहिती अधिकार कायदानुसार स्वयंघोषित माहिती, विविध अभ्यासक्रमांची माहिती, विविध नावांची यादी, उपक्रमांची माहिती इतर आवश्यक माहिती) अद्यावत, योग्य व बिनचुक विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करुन वेबसाईट अद्यावत करावी. प्रसिध्द केलेली माहिती संबधित विभागानी बरोबर असल्याचे खात्री करुन घ्यावी. व सदरची माहिती वेळोवेळी अद्यावत करावी.

तसेच, विद्यापीठाच्या इमारतीमध्ये फलकाव्दारे प्रसिध्द केलेली माहिती (उदा. नागरीकांची सनद, माहिती अधिकार कायदा नुसार प्रसिध्द केलेली माहिती, विविध समितीचे फलक, केबिनबाहेर अधिकाऱ्यांच्या नावाचे फलक) तपसाणी करुन यामध्ये वेळेनूसार झालेले बदल विचारात घेवून सदरची माहिती अद्यावत करुन त्याप्रमाणे संबधित अधिविभाग व प्रशासकीय विभागाने फलक लावावेत.

विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेली माहिती व विविध फलकावरील माहिती तपासणेची व वेळोवेळी अद्यावत ठेवणेची जबाबदारी संबधित अधिविभाग व प्रशासकीय विभागाची राहिल. याची नोंद घ्यावी.

कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. आस्थापना/ 2129

दि. 19 DEC 2023

प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी तसेच, सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी